# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ मार्च, २०१७ / फाल्गुन १८, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री | |
| (३) | पर्यावरण मंत्री | |
| (४) | पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

### महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने मागणीपेक्षा अधिक छपाई केल्याबाबत

**(१) * ७४१२१ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने छपाईच्या

नियोजनाअभावी मागणीपेक्षा अधिक पुस्तकांची छपाई झाल्याने बालभारतीचे सुमारे १ कोटी ७८ लाख ७२ हजार ९३८ रुपयांचे नुकसान झाले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने (बालभारती) गत दोन वर्षात सहावी व सातवीसाठी २ कोटी ७ लाख २१ हजार ७१६ पुस्तकाची मागणी असताना छपाई मात्र २ कोटी १७ लाख ३६ हजार १०० पुस्तकाची केल्यामुळे १० लाख १४ हजार ३०४ पुस्तकांची छपाई अधिक झाल्याने सदर पुस्तके रद्दीत विकण्यात आल्याचा आरोप भारतीय मजदूर संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान करणा-या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दरवर्षी जूनमध्ये शाळांना पाठयपुस्तकांचा पुरवठा झाल्यानंतर काही जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांच्यामार्फत वाढीव मागणी प्राप्त होत असल्याने आणि पुस्तकांची खुली विक्री करण्याकरिता पाठयपुस्तकांचा जादा साठा (बफर स्टॉक) करावा लागतो.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे बागणी (ता.वाळवा, जि. सांगली) येथील योगेश दुध संकलन केंद्रावर अन्न व औषध प्रशासन विभागाने छापा टाकल्याबाबत**

**(२) * ७९१८३ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बागणी (ता. वाळवा, जि. सांगली) येथील योगेश दुध संकलन केंद्रामध्ये मोठया प्रमाणात भेसळ करुन दुध निर्मिती करण्यात येत असल्याने सदर केंद्रावर अन्न व औषध प्रशासन विभागाने माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाव्दारे दि. २०/०१/२०१७ रोजी मे. योगेश दुध संकलन केंद्र, बागणी, ता. वाळवा, जि. सांगली या ठिकाणी धाड टाकली असता, तेथे गाई व म्हशीचे दूध, पांढरे द्रावण, रिफाइंड पाम कर्नेल तेल व स्किम्ड मिल्क पावडर या भेसळकारी पदार्थाचा साठा आढळून आला. दुधाचा तसेच पांढ-या द्रावणाचा साठा नाशवंत असल्याने, त्या दोघांचे नमुने विश्लेषणासाठी घेऊन उर्वरीत साठा नष्ट करण्यात आला, तर रिफाइंड पाम कर्नेल तेल व स्किम्ड मिल्क पावडर या भेसळकारी पदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित साठा जप्त करण्यात आला.

(२) दि. १७/०२/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या विश्लेषण अहवालानुसार, विश्लेषणासाठी घेण्यात आलेले दुधाचे नमुने मानदाप्रमाणे नसल्याचे स्पष्ट झाले. तर पांढरे द्रावण, रिफाइंड पाम कर्नेल तेल व स्किम्ड मिल्क पावडर हे नमुने अपमिश्रकाचे असल्याचे स्पष्ट झाले. सदर अहवाल संबंधित पेढीस पाठविण्यात आला असून अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत संबंधितावर नियमानुसार पुढील कारवाई येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर (ता. संगमनेर, जि.अहमदनगर ) येथील प्रागतिक शिक्षण संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू

**(३) * ७४८१० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील प्रागतिक शिक्षण संस्थेच्या

कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या आदेशानुसार रक्तवाढीसाठी फॉलीक ॲसिड व आयर्नच्या देण्यात आलेल्या गोळ्यांचे सेवन केल्याने प्रणित भास्कर गुंजाळ या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच मृत विद्यार्थ्याच्या नातेवाईकांना कोणत्या स्वरुपाची आर्थिक मदत करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) दिनांक २१.१२. २०१६ रोजी प्रणीत भास्कर गुंजाळ या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे. तथापी शवविच्छेदन व रासायनिक तपासणी अहवाल अप्राप्त असल्याने मृत्यूचे कारण निश्चित करण्यात आलेले नाही.

(२) आरोग्य विभागामार्फत सदर घटनेच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून चौकशीच्या अहवालानुसार कोणीही दोषी आढळून आले नाही. तथापि, आर्थिक मदत देण्याबाबत शासनाचे धोरण नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीतील रसायन मिश्रित पाणी नाल्यात सोडण्यात येत असल्यामुळे होणारे प्रदूषण

**(४) * ७५५७९ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक वसाहतीतील रसायन मिश्रित दुषित पाणी दररोज रात्रीच्या वेळी नाल्यात सोडण्यात येत असल्यामुळे त्या परिसरातील नागरिकांना श्वसनाचे, त्वचेचे व डोळ्याचे विकार जडले असून हजारो रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जुईनगर रहिवाशांनी हजारो नागरिकांच्या सह्यांचे निवेदन मा. मुख्यमंत्री व प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार रसायन मिश्रीत पाणी जुईनगरमधील नाल्यात सोडण्या-या कारखान्यांवर कोणती कारवाई केली तसेच रसायन मिश्रीत पाणी सोडू नये व त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि.१७.१.२०१७ रोजी प्राप्त झालेली तक्रार व दैनिक सकाळ या वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.२३.०१.२०१७ रोजी केलेल्या पाहणीच्या वेळी औद्योगिक सांडपाणी चेंबर तुबंल्याने जुईनगर परिसरातून पुढे वाशी खाडीला मिळणाऱ्या नाल्यात मिसळत असल्याचे निदर्शनास आले. सदरहू घटना तात्काळ सामायिक सांडपाणी प्रकिया केंद्र हाताळणा-या संस्थेच्या निदर्शनास आणून ते त्वरीत थांबण्याच्या सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दि.२४.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या. त्या अनूषंगाने सामायिक सांडपाणी प्रकिया केंद्र हाताळणा-या संस्थेने नाल्यात मिसळणारा विसर्ग थांबविल्याचे कळविले असून याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दि.२५.०१.२०१७ रोजी शहानिशा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील उद्योगांमुळे प्रदूषणामध्ये झालेली वाढ

**(५) * ७८४९४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१५ ते माहे ऑक्टोबर, २०१६ या २२

महिन्यांच्या कालावधीत तब्बल १९९ व्यक्तींचा प्रदुषणामुळे मृत्यू झाल्याचे जिल्हा सामान्य रुग्णालयाने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केलेल्या आकडेवारीत नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात वेस्टर्न कोलच्या ३० पेक्षा जास्त प्रमाणात कोळसाखाणी पेपरमिल, पाच सिमेंट कारखाने पोलाद उद्योग, वीज केंद्र इ.उद्योगामुळे जिल्हयात मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होत असून माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत श्वसनाच्या आजाराने ४८ जणांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रदुषणाला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार जानेवारी ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत ४८ रुग्णांचा श्वसनाचे आजाराने मृत्यू झाला आहे. सदर मृत्यू होण्यामागे प्रामुख्याने धुम्रपान, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन इत्यादी कारणे आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत स्वस्त दरात देण्यात येणाऱ्या धान्याची काळया बाजारात होत असलेली विक्री

**(६) * ७६२७९ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न सुरक्षा योजना, अंत्योदय योजना व दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना स्वस्त दरात देण्यात येणा-या धान्याची काळया बाजारात विक्री करण्यात येत असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक स्वस्त धान्य दुकानातील धान्याची काळया बाजारात दरमहा विक्री होत असुन हैद्राबादमध्ये पाव बनविण्यासाठी सदरहू धान्य दुकानातील गहू पाठविण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त योजनेअंतर्गत लाभार्थ्याला पावती न देता त्यांची पावतीवर स्वाक्षरी किंवा अंगठा घेऊन त्या पावतीवर जास्तीच्या धान्याचा उल्लेख करुन अभिलेख्यामध्ये तशी नोंद केली जाते व याकडे संबंधित शासकीय यंत्रणेकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे. स्थानिक गुन्हे शाखा नांदेड येथील पथकाने मौजे लख्खा, ता.देगलूर येथील रास्तभाव दुकानदार श्री.मंगरुळे यांचेवर पोलीस स्टेशन देगलूर येथे दि.२९.१२.२०१६ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) सदर गुन्ह्यानंतर श्री.मंगरुळे यांच्या मौ.लख्खा येथील रास्तभाव दुकानाची नायब तहसिलदार पुरवठा यांच्याकडून स्थळ चौकशी करण्यात आली असता माहे डिसेंबर, २०१६ चे धान्य दि.२९.१२.२०१६ रोजी शासकीय धान्य गोदाम, देगलूर येथून उचल केले, मात्र दुकानात आणून वाटप केले नाही असे तपासणीत उघडकीस आले असून दि.१७.१.२०१७ च्या आदेशान्वये त्यांचे प्राधिकार पत्र रद्द करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जिल्हा पातळीवर विद्यापीठ उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(७) * ७७७१६ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक विद्यापीठांअंतर्गत चार ते पाच जिल्हे कार्यक्षेत्र म्हणून येत

असून जिल्हा पातळीवर विद्यापीठाचे उपकेंद्र नसल्याने जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामांसाठी शेकडो किलोमीटरचे अंतर ओलांडून विद्यापीठात जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत असून कालापव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांनी प्रत्येक जिल्हा पातळीवर विद्यापीठ उपकेंद्र सुरु करण्याबाबत दिनांक २० डिसेंबर, २०१६ ते दिनांक १० जानेवारी, २०१७ या कालावधीत राज्यात मोर्चे काढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीकरिता प्रत्येक जिल्हा पातळीवर विद्यापीठ उपकेंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

(३) होय, हे अंशतः खरे आहे.

(४) राज्यातील अकृषी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण विहित करण्यासाठी माजी प्र.कुलगुरु डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशींना शासनाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे, मुंबईसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रकरणातील ३४ कोटी रुपये शासनाकडे थकित असल्याबाबत

**(८) * ७३९०५ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अजित पवार (बारामती), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, मुंबईसह राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विमा संलग्न ठेव, रजेचे रोखीकरण, वैद्यकीय प्रतिपूर्ती, वाढीव तुकड्या, अन्य पुरवणी देयके असे विविध प्रलंबित प्रकरणांतील सुमारे ३४ कोटी रुपये शासनाकडे थकित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे, मुंबईसह राज्यातील इतर सर्व जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कोटयवधी रुपयांची थकबाकी तातडीने देण्याबाबत लोकप्रतिनिधी, शिक्षक संघटना यांनी प्रधान सचिव, शालेय शिक्षण, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक व शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली असून या प्रकरणी शिक्षण सचिवांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिल्याने शिक्षण विभागाने याची दखल घेऊन शिक्षकांची राहिलेली थकबाकी तातडीने देण्यासाठी शासन निर्णय जारी केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकबाकी अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) ठाणे मुंबईसह पूर्ण राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची एकूण ३१४९४४ हजार (३१ कोटी ४९ लाख व ४४ हजार) एवढी रक्कम थकित आहे, हे खरे आहे.

(२) या संदर्भात लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती. तथापि, माहे जानेवारी, २०१७ मध्ये कोणताही शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.

(३) विभागाच्या दि.२४ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये वेतन अनुदानाची थकबाकी संदर्भात गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हयातील हज यात्रेकरूकरीता औरंगाबाद विमानतळांवरून प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(९) * ८००४८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील हज यात्रा करणा-या यात्रेकरूंसाठी नागपूर विमान तळावरून सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयापासून भौगोलीक दृष्टया औरंगाबाद विमानतळ कमी अंतरावर असतांना सुध्दा नागपूर येथून सुविधा असल्यामुळे यात्रेकरूंची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील हज यात्रेकरूंकरीता औरंगाबाद विमान तळांवरून प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. अल्पसंख्यांक व औकाफ मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. बुलढाणा जिल्हयातील काही तालुक्यांना रस्त्याने औरंगाबाद जवळ असून काही तालुक्यांना रेल्वेने नागपूर सोयीस्कर ठिकाण आहे.

(३) होय.

(४) सद्य:स्थितीत विदर्भातील सर्व जिल्हयांकरिता नागपूर इम्बारकेशन पॉईंट निश्चित करण्यात आलेले आहे. केंद्रीय हज समितीच्या नियमांनुसार उड्डाण केंद्र (Embarkation Point) ची निवड करण्यासाठी "जिल्हा" हा घटक धरण्यात येतो. बुलढाणा जिल्हयापैकी काही तालुक्यांना औरंगाबाद सोयीचे असून काही तालुक्यांना नागपूर सोयीचे असल्याने या संदर्भात जिल्हयात एकवाक्यता नाही. बुलढाणा जिल्हयातील सर्व तालुक्यांमधील हज यात्रेकरुंनी मागणी केल्यास नियमाप्रमाणे बदल करण्याबाबत केंद्रीय हज समिती विचार करु शकते. सन २००५ मध्ये वरील सोयीत बदल करुन औरंगाबाद उड्डाण केंद्र निश्चित करण्यात आले होते. तथापि त्यावेळी जिल्हयातील लोकांची मागणी विचारात घेवून नागपूर उड्डाण केंद्र निश्चित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयात अल्पसंख्यांक (मुस्लीम) समाजातील मुलींकरिता वसतीगृह सुरु करण्याबाबत

**(१०) * ७५१३९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील अल्पसंख्यांक (मुस्लीम) समाजातील मुला-मुलींना विद्यार्जन घेता यावे याकरिता मुलींसाठी धुळे येथे वसतीगृह व्हावे अशी मागणी येथील स्थानिक नागरीकांनी व माजी नगराध्यक्ष यांनी मा. शिक्षणमंत्री यांना एका निवेदनाद्वारे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने धुळे येथे अल्पसंख्यांक समाजाच्या (मुस्लीम) मुला-मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) मुलींच्या वसतीगृहाकरिता जागा उपलब्ध होणेबाबत जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडे मागणी करण्यात आली आहे. तसेच धुळे महानगरपालिका यांचेकडेही

विनंती करण्यात येत आहे. जागेच्या उपलब्धतेनंतर वसतीगृहास मान्यता देण्याविषयी निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा शाळांमध्ये मुलभूत सोयी-सुविधांच्या अभावी विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान

**(११) * ७३८४५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.योगेश सागर (चारकोप), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण अधिकार कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्याच्या शासनाच्या आदेशानुसार राज्यातील सहा जिल्ह्यांतील १२७ शाळांचे बाल हक्क अभियानांतर्गत सर्वेक्षण केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२७ शाळांमध्ये शिक्षणाकरिता पोषक वातावरण नसून उक्त शाळांपैकी ६४ म्हणजे फक्त ५० टक्के शाळांत पहिली ते चौथीसाठी दोन वर्ग खोल्या उपलब्ध असून १८ शाळांत ५ खोल्या आढळून आल्या, तसेच ९४ टक्के शाळांमध्ये ग्रंथालय नाही व १५० शिक्षकांच्या मंजुर जागापैकी १०१ शिक्षकांची पदे भरण्यात आली आहेत व ३२.६७ टक्के शिक्षकांच्या जागा रिक्त असून सदर शाळांमध्ये पायाभुत सुविधा, शिक्षक नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित रहावे लागत असल्याचे उक्त सर्वेक्षणातून माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सर्व मुलांना शिक्षण मिळावे याकरिता कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) शासनाच्या आदेशानुसार राज्यातील सहा जिल्हयांतील १२७ शाळांचे बाल हक्क अभियानांतर्गत सर्वेक्षण करण्यात आले हे खरे नाही.

सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये आवश्यक मुलभूत भौतिक व शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही शासनाकडून प्राथम्याने करण्यात येते. याच अनुषंगाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रम राबविण्यात येत आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार प्रत्येक विद्यार्थ्यास शिक्षण मिळेल याबाबत शासन कटिबध्द आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग येथील गोदामात १२ हजार क्विंटल भात साठा शिल्लक असल्याबाबत

**(१२) * ७६२८९ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग येथील गोदामात सन २०१५-१६ मध्ये शेतकऱ्यांकडून खरेदी

करण्यात आलेला १२ हजार ३७८ क्विंटल भात साठा शिल्लक असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच यावर्षीचा भात कापणी हंगाम संपूनही शासनाने शेतकऱ्यांकडून अद्याप भात खरेदी केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून भात खरेदी होत नसल्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला खाजगी दलालांना कमी भावाने भात विक्री करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आहे व त्यानुषंगाने सन २०१६-१७ चा भात शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

खरीप पणन हंगाम २०१५-१६ मध्ये सिंधुदूर्ग जिल्हयात खरेदी केलेल्या एकूण १४७६०.८२ क्विं.धानापैकी १३९५६.४७ क्विं. धान भरडाईविना शिल्लक आहे.

(२) हे खरे नाही.

खरीप पणन हंगाम २०१६-१७ मध्ये आतापर्यंत ११७४६.३० क्विं. धानाची एकूण १२ केंद्रांवर खरेदी करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयात प्रदुषण दूर करण्याकरीता जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्याबाबत

**(१३) * ७५१०५ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील सनफ्लाग स्टील कंपनी, मॅग्नेज खाणी, क्लैरीयन केमिकल कंपनी, रेती घाट, वैनगंगा नदीमध्ये सोडले जाणारे नाग नदीचे प्रदूषित

सांडपाणी यांचेमुळे होणारे प्रदूषण दूर करण्याबाबत व प्रतिबंध घालण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाची पर्यावरण विभागाची जिल्हास्तरावरील प्रतिनिधी समितीचे गठन झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे उक्त जिल्ह्यातील नव्याने प्रस्थापित होणाऱ्या विकास प्रकल्पासाठी तयार करण्यात येणाऱ्या "पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल" व जनसुनावणीबाबत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी जिल्हा पर्यावरण समितीस सूचित करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अहवाल सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. पर्यावरण विषयक जन जागृती करण्यासाठी तसेच पर्यावरणाशी संबधीत सर्व विभागाशी समन्वय करुन स्थानीक पर्यावरणीय समस्येवर उपाय योजनांची शिफारस करण्याकरिता भंडारा जिल्ह्यात दिनांक २९/०२/२०१६ रोजी जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक ०५/०५/२०१६ रोजी आयोजित जिल्हा पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीमध्ये प्रश्नाधिन प्रकल्पाबाबत चर्चा करण्यात आली होती. जिल्हा पर्यावरण समितीच्या सदर सुनावणीच्या अनुषंगाने मत व्यक्त करण्याकरिता जाहिरात प्रकाशित करण्यात आली आहे.

-----------------

**नारे (ता.वाडा, जि. पालघर) येथील मे. सेंट गोबेन इंडिया लि. (जिप्सम) या कंपनीमुळे होणारे प्रदूषण**

**(१४) * ७८३४२ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नारे (ता.वाडा, जि. पालघर) गावच्या हद्दीत मे. सेंट गोबेन इंडिया लि. (जिप्सम) या प्लास्टर ऑफ पॅरिसचे शीटस् व पावडर उत्पादन करणाऱ्या कंपनीतून उत्सर्जित होणा-या घटकांमुळे पाणी दूषित झाले असून ग्रामस्थांना

बाहेरून पाणी विकत आणावे लागत आहे तसेच दूषित हवेमुळे आरोग्य धोक्यात येऊन रासायनिक पावडरमुळे जमिन नापिक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने बिगरशेती कायद्याचे उल्लंघन करून कंपनीत मोठया प्रमाणात बांधकाम करून नैसर्गिक नाला बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीने मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मा.उद्योग मंत्री, मा.पालकमंत्री, प्रदूषण मंडळ, जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी यांच्याकडे सन २००३ पासून सतत तक्रारी करून कंपनीवर कारवाई करण्याची मागणी करूनही शासनाने कोणतीही दखल न घेतल्यामुळे पुढील काळात ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच जिप्सम कंपनी गावाबाहेर स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कुडुस, यांच्याकडून दि. १४.०२.२०१७ रोजी प्राप्त अहवालानुसार नारे गावातील पिण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या स्त्रोताचे पाणी (कूपनलिका) हे पिण्यास योग्य आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मप्रनि मंडळाच्या कल्याण येथील कार्यालयास ग्रामपंचायत नारे, ता. वाडा, जि.पालघर यांच्यामार्फत तक्रार अर्ज दि. २६.१२.२०१६ रोजी प्राप्त झाला होता. सदर तक्रारीच्या अनुषंगाने, उदयोगास दि. ०३.०१.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस व तद्नंतर हवा व जल कायद्याअंतर्गत दि. १२.०१.२०१७ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईमधील जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडवर अंधेरी येथे अनधिकृत रेडी मिक्सर कॉंक्रीट प्लांट सुरु असल्याबाबत**

**(१५) * ७४४९२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोडवर अंधेरी येथे अनधिकृतपणे रेडी मिक्सर कॉंक्रीट प्लांट सुरु असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित लवाद यांनी आरे दुग्ध वसाहत व परिसर येथे कोणतेही बांधकाम करण्यास बंदी केली असताना सदर अनधिकृत प्लांट उभारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्य प्रदूषण महामंडळाकडे वॉचडॉग फाऊंडेशनने उक्त तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्लांट स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी अंती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर प्रकल्पास कारणे दाखवा नोटीस बजावली असून रिलायन्स् एनर्जीला विद्यूत पुरवठा खंडीत करण्याचे आदेश दिले आहेत. सद्यस्थितीत हा प्रकल्प् बंद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावदा (ता.भुसावळ जि.जळगाव) येथून निळे रॉकेल जप्त केल्याबाबत**

**(१६) * ७९२४९ श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा (ता.भुसावळ जि.जळगाव) येथून जामनेरकडे काळ्या बाजारात निळे

रॉकेल विक्रीसाठी घेऊन जात असलेल्या ट्रकवर यावल नाक्यावरील महात्मा गांधी पुतळ्यासमोर दिनांक २२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिसांनी कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारवाईत किती जणांना अटक करण्यात आली व किती रॉकेल जप्त करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधितांवर तसेच अटक करण्यात आलेल्यांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीनुसार भुसावळ शहर पोलीसांनी भुसावळ शहरात गांधी पुतळ्यासमोर ट्रक अडवून त्याची तपासणी केली असता ३००० लिटर केरोसिन आढळून आले.

पुरवठा तपासणी अधिकारी, तहसील कार्यालय, भुसावळ यांनी पंचनामा करुन केरोसिन व ट्रक पोलिसांचे ताब्यात दिला. सदर प्रकरणी जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील ३ व ७ नुसार भुसावळ शहर पोलिस स्टेशनमध्ये भाग ६ गुन्हा क्र.३००५/२०१७ दाखल करण्यात आलेला आहे व ट्रक चालकाला अटक करण्यात आली असून, सदर प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे, कल्याण, नवी मुंबई आणि पनवेल शहरात मावा आणि खवा तसेच भेसळयुक्त बर्फीचा साठा जप्त केल्याबाबत

**(१७) * ७५३५४ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण, नवी मुंबई आणि पनवेल शहरात अन्न व औषध प्रशासनाने सुमारे ३ हजार किलो मावा आणि खवा तसेच भेसळयुक्त बर्फीचा साठा माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, जप्त केलेल्या साठ्यातील अन्न नमुन्यांचे तपास करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय व याबाबतचा विश्लेषण अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) माहे सप्टेंबर, २०१६ ते माहे ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत ठाणे, कल्याण, नवी मुंबई आणि पनवेल शहरात नियमित कारवाई अंतर्गत अन्न व औषध प्रशासनाव्दारे खव्याचे एकूण १७ नमुने तर स्पेशल बर्फीचे एकूण ११ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. तसेच भेसळीच्या संशयावरून खव्याचा रू. ४,८९,०९०/- किमतीचा १३५२४ किलो तर स्पेशल बर्फीचा रू. ६,१२,९४०/- किमंतीचा २९६८ किलो साठा जप्त करण्यात आला.
(२) विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या खव्याच्या १७ नमुन्यांपैकी १ नमुना कमी प्रतीचा तर ६ नमुने मानदाप्रमाणे असल्याचे विश्लेषणाअंती स्पष्ट झाले तर उर्वरित १० नमुन्यांचे अहवाल प्रतिक्षाधीन आहेत.
विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या स्पेशल बर्फीच्या ११ नमुन्यांपैकी १० नमुने मानदाप्रमाणे असल्याचे विश्लेषणाअंती स्पष्ट झाले तर उर्वरित ०१ नमुन्याचा अहवाल प्रतिक्षाधीन आहेत .
(३) प्रतिक्षाधीन विश्लेषण नमुन्यांचा अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील कारवाई घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी (जि.परभणी) येथील पुरवठा विभागाच्या गोदामातील शिधावाटप धान्याचा झालेला गैरव्यवहार

**(१८) * ७७४७८ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजेश**

**काशीवार (साकोली), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) येथील पुरवठा विभागाच्या सुमारे रु.५ कोटीच्या शिधावाटप धान्याचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणी ३७ आरोपींपैकी १३ जणांना दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहारामध्ये किती अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे तसेच दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या पथकाने केलेल्या गोदाम तपासणी अहवालानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या अंदाजे ४ कोटी ९७ लाख ६९ हजार ९२९ रुपये एवढया किंमतीच्या अन्नधान्याचा परभणी येथील शासकीय गोदामातून अपहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणात दि.१३.८.२०१६ रोजी गु.र.नं. ३०५/१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी श्री अनिल आंबेराव, गोदामपाल परभणी, श्री सि.बी. पांचाळ, नायब तहसिलदार (पुरवठा) परभणी, श्री. संतोष रुईकर, तहसिलदार, परभणी, श्री. दिलीप कच्छवे, जिल्हा पुरवठा अधिकारी परभणी यांना निलंबीत करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील गोंडवाना विद्यापीठातील पुनर्मुल्यांकन पध्दतीत होत असलेला गैरव्यवहार

**(१९) * ७८६०७ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील गोंडवाना विद्यापीठातील पुनर्मुल्यांकन पध्दतीत गैरव्यवहार होत असुन त्याचे एक रॅकेट कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यापीठांतर्गत अभियांत्रिकी वर्गाची परीक्षा संपल्यानंतर विद्यापीठस्तरावर स्पॉट व्हॅल्युएशन केले जात असुन त्यामध्ये विद्यार्थ्यांना जाणीवपुर्वक नापास केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून प्रत्येक विषयाचे १५ ते १८ हजार रूपये वसुल करून त्यांना उत्तीर्ण करून घेण्याच्या गैरव्यवहारात संबंधित महाविद्यालयाचे प्राध्यापक,विद्यापीठातील लिपीक व अधिकारीही सहभागी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या पुनर्मुल्यांकन पध्दतीच्या गैरव्यवहारात गुंतलेल्या विद्यापीठातील अधिका-यांची व महाविद्यालयाच्या कर्मचा-यांच्या कामकाजाची चौकशी करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा स्वरुपाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही. अभियांत्रिकी विद्याशाखेच्या उत्तर पत्रिका मुल्यांकन केंद्रावर ऑनस्क्रीन पध्दतीने मुल्यांकन केले जाते व उत्तर पत्रिकांना स्कॅन आयडीनंबर असतो कि ज्याने कोणत्याही मुल्यांकन करणा-या प्राध्यापकाला उत्तर पत्रिका कोणाची आहे हे कळत नाही. अर्थातच कोणत्याही विद्यार्थ्याला जाणीवपूर्वक नापास करण्याचा प्रश्नच नसतो.

(३) हे खरे नाही.

(४) विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतुदीनुसार दिनांक २०.०१.२०१७ रोजी माहिती प्राप्त होताच प्राधिकरणांतील ०३ तज्ञ व्यक्तीची समिती गठीत केली आहे आणि दिनांक २०.०१.२०१७ रोजी सदर समितीला पत्र देवुन सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर प्रकरणाची चौकशी सुरु असुन चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सिमेट कंपन्यांमुळे शेतीचे होणारे नुकसान**

**(२०) * ७८७२९ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यात अस्तित्वात असलेल्या अल्ट्राटेक सिमेंट, माणिकगड, अंबुजा, मुर्ली ॲग्रो सिमेंट कंपन्यांमुळे या क्षेत्रातील रस्त्यालगत असलेले कापसाचे पिक पूर्णपणे काळया रंगाचे झाल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपन्यामुळे शेतक-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तदनुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली व उक्त कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील जि.प.च्या शाळांमधून विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याबाबत

**(२१) * ७८६२१ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १५८ शाळांमधून जवळपास १२ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून अर्धेकच्चे शिजलेले व निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अन्नाचे परिक्षण प्रयोगशाळांमध्ये केले जात नसल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने निकृष्ट अन्नाचा दर्जा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यांतर्गत जिल्हा परिषदेच्या सायदे व खाडाळा या दोन शाळांमध्ये शिजण्यास उशिर लागत असलेला वाटाणा आढळून आल्याने संबंधित पुरवठेदाराकडून सदर वाटाणा बदलून घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील कुलाबा किल्ल्याची झालेली दूरवस्था

**(२२) * ७६५६० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील कुलाबा किल्ल्याची पडझड झाली असून किल्ल्याच्या पडलेल्या तटबंदीच्या दुरूस्तीची सुरू करण्यात आलेली कामे सध्या बंद असून अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त किल्ला पाहण्यासाठी देशी व विदेशी पर्यटक भेटी देत असून त्यांना मुलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त किल्ल्याच्या दुरूस्तीसाठी व पर्यटकांच्या मुलभूत सोयी सुविधेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही,

हा किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडलाच्या अधिपत्याखाली आहे. याबाबत अधिक्षक, पुरातत्वविद् भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडळ कार्यालय,मुंबई यांच्याकडून प्राप्त माहिती नुसार या किल्ल्याच्या जतन-दुरुस्तीचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण केले असून त्या अंतर्गत पायवाटा, सुलभ शौचालये तसेच दिशादर्शक फलक या मूलभूत सुविधा देण्यात आल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यातील काम पुढील आर्थिक वर्षी सुरु करण्यात येणार असून उर्वरित मुलभूत सुविधा निर्माण करण्याचे काम या टप्प्यात करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मळेगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२३) * ७५२९९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळेगाव (ता.शहापूर,जि.ठाणे) या गावांसाठी सन २००८-२००९ या कालावधीमध्ये तब्बल ८३ लाख ७५ हजार ०५१ रूपयांच्या मंजूर झालेल्या व ७ वर्षानंतर पूर्ण झालेल्या उक्त योजनेतून ग्रामस्थांना अद्याप पिण्यासाठी पाणी मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील निकृष्ट दर्जाचे काम व अनियमितता तसेच गैरव्यवहार इ.बाबत मळेगाव ग्रामस्थांनी सातत्याने तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे ग्रामस्थांनी दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी पासून शहापूर तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणही सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू योजनेच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सन २००८-०९ या कालावधीत भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत मौ.मळेगाव, ता.शहापूर येथे रक्कम रु.५३,७५,०५१/- ची नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. माहे डिसेंबर २०१५ ते जून २०१६ पर्यंत पाणी पुरवठा सुरु होता. नंतर ग्रामपंचायत व समितीच्या देखभाल दुरुस्ती अभावी योजना जून २०१६ ते डिसेंबर २०१६ पर्यंत बंद होती. सद्यस्थितीत या योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु केलेला आहे.
(२) व (३) होय.

मळेगाव येथील ग्रामस्थ दि.१४ डिसेंबर, २०१६ दरम्यान शहापूर तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते.

ग्रामस्थांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर योजनेच्या कामाची चौकशी उप अभियंता, उपविभाग अंबरनाथ यांच्यामार्फत करण्यात आली. सदर योजनेच्या कामात तांत्रिक अनियमितता झाली असून, त्यास जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांना दि.१४.२.२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्यांचे खुलासे प्राप्त होताच पुढील कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयामधील अध्यापकांना वेतन मिळाले नसल्याबाबत

**(२४) * ७५९८७ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.भीमराव धोंडे**

**(आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राहूल कुल (दौंड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४० टक्के अभियांत्रिकीचे महाविद्यालयामधील अध्यापकांना ३ ते ९ महिन्यांचे वेतन मिळालेले नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मागासवर्गीय तसेच आर्थिकदृष्टया मागासवर्गीय भागात विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीचे उच्चशिक्षण घेता यावे यासाठी पन्नास टक्के प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची शुल्क प्रतिपुर्ती शासनाकडून केली जाईल असे जाहीर केले असूनही उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सदरहू महाविद्यालयांना मागासवर्गीयांची शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती तसेच आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी सवलत इ.करीता दीड हजार कोटी रूपये शासनाने दिले नसल्याने अध्यापकांना वेतन मिळू शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालय चालविणाऱ्या संस्थाच्या महाविद्यालयातील अध्यापकांना वेतन अदा न करणाऱ्या महाविद्यालयांच्या फी मध्ये २५ टक्क्यांनी कपात करण्याचा निर्णय शासनाच्या शिक्षण शुल्क समितीने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने शिक्षणशुल्क प्रतिपूर्तीची रक्कम तसेच सदरहू महाविद्यालयातील अध्यापकांना मागील थकबाकीसह सर्व वेतन विनाविलंब देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना करावयाच्या शुल्क प्रतिपूर्तीची सन २०१५-१६ या वर्षापर्यंतची थकबाकी सर्व संस्थांना अदा करण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करण्यात येत आहे.

तथापि, यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**ठाणे खाडीकिनारी खारफुटीच्या परिसरातील अतिक्रमणे, बांधकामाचा घनकचरा इ.मुळे खाडी प्रदूषित झाल्याबाबत**

**(२५) * ७९७३१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील गायमुख, कोलशेत व रेतीबंदर या खाडीकिनारी खारफुटीच्या परिसराजवळील अतिक्रमणे, बांधकामाचा घनकचरा आणि खाडीत जाऊन मिसळणाऱ्या नाल्यातून येणारा कचरा यामुळे ठाण्याची खाडी मोठया प्रमाणांवर प्रदुषित झाल्याचे महापालिकेने प्रसिध्द केलेल्या प्रदुषण नियंत्रण विभागाच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तिवरांच्या किंवा खारफुटीच्या परिसरात ५० मीटर अंतरात कोणतेही बांधकाम किंवा भराव टाकू नये असा उच्च न्यायालयाचा आदेश असतानाही मुंबई-नाशिक महामार्गावरील माणकोली व खारेगांव टोलनाका भागातील खाडी बूजवून तिवरांची जंगले नष्ट करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कळवा खाडी (जि.ठाणे) किनाऱ्यालगत भूमाफियांनी तिवरांची झाडे तोडून अनधिकृत भराव टाकून बेकायदेशीर बांधलेल्या अतिक्रमित बांधकामाचा घनकचरा व नाल्यांमधून वाहत येणारे दूषित पाणी यामुळे ठाण्याची खाडी दूषित होऊन खारफुटीची जंगले धोक्यात आली आहेत तसेच बाळकूम-साकेत, कळवा परिसरात रात्रीच्या वेळी खाडीच्या दलदलीत भराव टाकण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणांची तिवरांची जंगले नष्ट करणाऱ्यांविरुध्द व त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच राज्यातील तिवरांची जंगले वाचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) ठाणे महानगरपालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालामध्ये तसे नमूद आहे.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे व महानगपालिका, ठाणे यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अहवालानुसार बाळकुम येथील खाडी किना-यावरील दलदलीच्या भागात भराव केल्याचे आढळून आले आहे.

(४) खाडीकिनारी अतिक्रमणे करणा-यांविरूद्ध तसेच कांदळवनाची झाडे तोडणा-यांविरूद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम,१९८६ अन्वये अंदाजे ३५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सन २०१६ साली ठाणे महानगरपालिकेमार्फत कोलशेत खाडी किनाऱ्यावर १०००० तिवरांची वृक्ष लागवड करण्यात आलेली असून ५०००० तिवरांची वृक्ष लागवड करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण महाविद्यालयांकरिता संगणक व लॅपटॉपच्या खरेदीचा प्रस्तावाबाबत

**(२६) * ७३९६१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी),**

**श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण महाविद्यालयांकरिता सादर करण्यात आलेला सुमारे तीन हजार संगणक व लॅपटॉपच्या खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाने संगणक खरेदी करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला परंतु या खरेदीसाठी सुमारे १३ कोटी रुपयांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात मात्र ८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील शासकीय अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण महाविद्यालयांना संगणक व लॅपटॉप देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालये व शासकीय शैक्षणिक संस्था यांच्याकरिता ४४९० संगणक खरेदी करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे खरे आहे.

(२) वार्षिक योजना २०१६-१७ मध्ये तंत्रशिक्षण उपविभागाकरिता यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या उद्दिष्टाकरीता रु.८.६७ कोटी इतका नियतव्यय उपलब्ध झाला आहे, हे खरे आहे.

(३) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये व शासकीय शैक्षणिक संस्थांना ४४९० संगणक उपलब्ध करुन देण्याची मागणी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे नोंदविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील आणि विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयात स्थायी समिती स्थापन करण्याबाबत

**(२७) * ७४१२३ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील आणि विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या २५० हून अधिक महाविद्यालयातील मागासवर्गीयांसाठीच्या धोरणाच्या योग्य अंमलबजावणीकरिता केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) केलेल्या सुचनानुसार मुंबई विद्यापीठामध्ये व संलग्न महाविद्यालयात ९ महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही स्थायी समिती स्थापन करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थायी समिती असणे आवश्यक असतांनाही स्थापन न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच स्थायी समिती स्थापनाबाबतची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई विद्यापीठात मागासवर्गीयांसाठीच्या धोरणाच्या योग्य अंमलबजावणीकरिताची स्थायी समिती (दि. ११ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१९) स्थापन करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात शिक्षक भरतीस बंदी असतानाही ५००० शिक्षकांच्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता देण्यात आल्याबाबत

**(२८) * ७५७८४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन**

**साळवी (राजापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिरिक्त शिक्षकांचा अन्य शाळांमध्ये समावेश होत नसल्यामुळे शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २ मे, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षक भरतीवर बंदी घालण्यात आली असतानाही सदर आदेशाचे उल्लंघन करुन राज्यातील अनेक संस्थाचालकांनी शिक्षण अधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन मुंबई शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या अंतर्गत ३०० तर राज्यात ५ हजारांच्यावर शिक्षकांच्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण संस्थांनी नियमानुसार प्रक्रिया न करता थेट नियुक्ती केलेल्या शिक्षकांचे वैयक्तिक मान्यता मिळविण्यासाठी शिक्षणखात्याकडे आलेले सर्व प्रस्ताव शिक्षण आयुक्तांनी दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास रद्द केले असून ज्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्या आहेत त्याही रद्द करण्याबाबतच्या दिलेल्या आदेशामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक भरती बंद असताना शिक्षकांच्या मान्यतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणा-या अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान राज्यातील प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दोन महिने वेतन मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गारगोटवाडी व पांडुर्णा (जि.नांदेड) येथील नळ पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(२९) * ७८४१० श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील आदिवासी क्षेत्रात असलेल्या गारगोटवाडी व पांडुर्णा गावासाठी विहीर खोदून गावापर्यंत पाईपलाईन व पाण्याची टाकी बांधकाम करणे इत्यादी कामांची शासनाने २२ कोटी रुपयांची नळ योजना मंजूर केली होती मात्र गत १० वर्षापासून सदर योजना प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना प्रलंबित असल्याने ग्रामीण आदिवासी जनतेची पाण्यासाठी गैरसोय होत असून मंजूर झालेल्या पाणी पुरवठा योजनेच्या निधीचा अनेकदा अपहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नळयोजनेचे काम पूर्ण करुन नियमित पाणीपुरवठा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अशंत:खरे आहे. गारगोटवाडी योजनेची किंमत २१ लक्ष ४८ हजार २५० रुपये व पांडुर्णा योजनेची किंमत १९ लक्ष ६६ हजार इतकी आहे. दोन्ही योजनेतून पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही. गारगोटवाडी पाणी पुरवठा समितीस १७ लक्ष ५२ हजार इतका निधी वितरीत केला असून समितीने १९ लक्ष रुपये किमतीची कामे केली आहेत. पांडुर्णा समितीस रु.८ लक्ष ५२ हजार इतका निधी वितरीत करण्यात आला असून समितीने आता पर्यत  रु.१० लक्ष ८४ हजार ६३६ इतक्या किंमतीची कामे केली आहेत.

(४) समितीच्या अंतर्गत वादामुळे कामास विलंब झालेला आहे.

-----------------

**विक्रमगड (जि. पालघर) तालुक्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये पुरेसे प्राध्यापक व प्रात्याक्षिकांच्या सोयी उपलब्ध नसल्याबाबत**

**(३०) * ७८३४५ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि. पालघर) तालुक्यातील ५ वर्षापूर्वी बांधलेल्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये शिक्षण घेणा-या ७५० विद्यार्थ्यांचे या महाविद्यालयामध्ये पुरेसे प्राध्यापक, प्रात्यक्षिकांच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळे व प्रशासनाच्या  दुर्लक्षित कारभारामुळे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तंत्रनिकेतन शाळेमध्ये पिण्याच्या पाण्याचा व स्वच्छतागृहाचा अभाव आहे तसेच  काही महिन्यापूर्वी स्लॅबचा भाग कोसळल्याने व महाविद्यालयाच्या इमारतीलाही  मोठया भेगा पडल्या असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे,  हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तंत्रनिकेतन शाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत शाळेच्या प्राध्यापकाने तंत्रशिक्षण विभाग, पालघर यांच्याकडे सन २०१४ पासून सतत पत्रव्यवहार केला असता अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही  खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) संस्थेत पुरेशी स्वच्छतागृहे असून सदर स्वच्छतागृहांची निगा बाहयस्त्रोतांकडून राखली जाते.  तसेच संस्थेत विद्यार्थ्यांना पिण्याचे पुरेसे पाणी उपलब्ध आहे.

संस्थेच्या प्रशासकीय इमारतीत तळमजल्यावरील खोल्यांच्या समोरील आवारात सिलींगचे प्लास्टर दि.२२/१०/२०१५ रोजी कोसळले होते. सदरबाबतची दुरूस्ती सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी केलेली आहे. तसेच संस्थेच्या इमारतीच्या भेगांच्या दुरुस्तीबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) संस्थेत अध्यापकांची ४८ मंजूर पदे असून संस्थेतील रिक्त पदे विचारात घेता इतर संस्थेतून ९ अध्यापकांच्या सेवा प्रतिनियुक्तीने सदर संस्थेत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तर संस्थेत सध्या २२ रिक्त पदे आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठांतील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यामध्ये झालेली अनियमितता

**(३१) * ७५३८३ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.किशोर पाटील (पाचोरा),**

**श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या पदांचा आढावा घेण्यासाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान नेमलेल्या टास्कफोर्सने आपला अहवाल आणि एक सादरीकरण उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू टास्कफोर्सने अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या नियमानुसार नसल्याचे व रोस्टर प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याचे, अनुदानित तत्त्वावरील जागावर विना अनुदानित कर्मचारी व विना अनुदानीत जागावर अनुदानीत कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या तसेच काही नियुक्त्यांपैकी ६० टक्के नियुक्त्यामध्ये अनियमितता झाल्याचे अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, व त्यानुसार दोषीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कार्यबल गटाने अनुकंपा तत्वावरील काही नियुक्त्या नियमानुसार झालेल्या नसल्याचे, काही नियुक्त्या बिंदुनामावलीनुसार नसल्याचे तसेच काही विना अनुदानित पदांवर अनुदानित कर्मचारी व अनुदानित पदांवर विना अनुदानित कर्मचाऱ्यांच्या बदल्या केलेल्या असल्याचे शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे. सदर अहवालावर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्व अन्न व औषधे प्रशासन कार्यालयांच्या नुतनीकरणाबाबत**

**(३२) * ७४८८४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषधे प्रशासन (एफडीए) कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी

व बेकायदा कामांवर छापे व जलद कारवाई करण्यासाठी राज्यातील सर्व अन्न व औषधे प्रशासन कार्यालयासाठी अद्ययावत यंत्रसामुग्री व इतर महत्वाच्या कामांसाठी रूपये १३७ कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्यात आल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर येथील प्रयोगशाळांचा विस्तार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न व औषधे प्रशासनाने सदर खर्च केलेल्या निधीचा संपूर्ण तपशील काय आहे,
(४) अद्याप, सदर निधी वापरला नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राज्यातील अन्न व औषध प्रशासनाचे बळकटीकरण करण्यासाठीच्या केंद्र शासनाच्या योजनेसाठी केंद्र शासनासोबत सामंजस्य करार करण्यास राज्य शासनाने दि. ०३/०१/२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर योजनेअंतर्गत राज्यातील अन्न व औषध प्रशासनाचे बळकटीकरण करण्यासाठी एकूण रू. १३६.९६ कोटी इतका निधी उपलब्ध केला जाणार आहे.
(२) होय, सदर योजनेअंतर्गत मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर येथील प्रयोगशाळांचा विस्तार व प्रशासनाच्या कार्यालयाचे बांधकामही करण्यात येणार आहे.
(३) व (४) अद्याप निधी अप्राप्त असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील 'कायम' शब्द वगळण्याबाबत**

**(३३) * ७४१२५ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा आणि

ज्युनियर महाविद्यालयामधील “कायम” शब्द वगळण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये घेऊनही या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापही झाली नसल्याबाबतचे निवेदन मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेने मा. शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिक्षण संघटनेने शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देणे, सर्व शिक्षकांना जुनी पेंशन लागू करणे, कायम विनाअनुदानित शाळा आणि ज्युनियर कॉलेजमधील वरिष्ठ सेवा आणि सेवा वेतनश्रेणी ग्राह्य धरणे यासंदर्भातही लेखी निवेदन माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हेही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त निर्णयाला तीन वर्षाचा कालावधी होत आला तरीही अद्याप अंमलबजावणी न झाल्याने यावर्षीच्या बारावीच्या परिक्षांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा राज्य (कायम) विनाअनुदानित उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयातील शाळा कृती समितीने दि.१२ जानेवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास पूणे येथील शिक्षण संचालक व शिक्षण आयुक्त आणि राज्य शिक्षण मंडळ यांना दिला असून दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास एस.एस.सी बोर्ड पूणे येथे मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागणीनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) होय.

(४) उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करण्याची सकारात्मक कार्यवाही सुरु आहे. शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सुधारीत आकृतीबंधासंदर्भात आयुक्त (शिक्षण) यांनी केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक १९/७/२०११ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ पूर्वी शाळा १०० टक्के अनुदानास पात्र ठरत असेल तर त्या शाळांमधील नियुक्त कर्मचा-यांना जूनी निवृत्तीवेतन योजना लागू होईल.

दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ नंतर शाळा १०० टक्के अनुदानास पात्र ठरली असेल तर त्या शाळांमधील नियुक्त कर्मचा-यांना नवीन अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१४ अन्वये कायम विनाअनुदान तत्वावरील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.